महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे
# जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

गुरुवार ■ १८ डिसेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १७३ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

## लक्षवेधी

## कोस्टल रोडसाठी 9 हजार झाडे तोडणार !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** २६.५ किमी लांबीच्या मुंबई कोस्टल रोड प्रकल्पासाठी बीएमसीने परिसरातील एकूण ६०,००० खारफुटीच्या झाडांपैकी ४५ हजार खारफुटीची झाडे ओळखली आहेत. त्यापैकी फक्त ९,००० झाडे पूर्णपणे तोडली जातील. तर उर्वरित ३६ हजार झाडे राज्यातील वेगवेगळया भागात स्थलांतरित केली जातील. मुंबईसारख्या किनारपट्टीच्या शहरासाठी खारफुटीची जंगले महत्त्वाची आहेत. कारण ती किनारपट्टीची धूप, भरती-ओहोटीचे पूर आणि वादळ लाटांपासून संरक्षण देतात. त्यांची दाट मुळे माती स्थिर करतात आणि लाटांची धूप कमी करतात.

## मलंगगडच्या वनसंपदेची राखरांगोळी !

### वणव्यामुळे लागलेल्या आगीत अनेक वृक्ष बेचिराख

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

अंबरनाथ : अंबरनाथ तालुक्यातील खरड गावाच्या हद्दीतील डोंगरावर मंगळवारी सकाळी लागलेल्या भीषण वणव्याने थैमान घातले. यामुळे श्री मलंगगड परिसरातील वनसंपदा जळून खाक झाली. सकाळच्या सुमारास लागलेल्या या आगीने काही वेळातच रौद्ररूप धारण करत डोंगर उतारावर पसरलेल्या गवताळ भागासह झुडपे व लहान वृक्ष जळून खाक केली आहेत. आगीचे लोळ आणि दाट धुराचे लोट दूरवरून दिसत असल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. डोंगरावर वणवा लागल्याची माहिती बदलापूर वनविभागाच्या वनरक्षकांना मिळताच आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले आहे. श्री मलंगगड परिसर हा निसर्गसंपन्न आणि जैवविविधतेने समृद्ध मानला जातो. या भागात नेहमीच विविध वन्यप्राणी, पक्षी तसेच दुर्मिळ वनस्पती आढळतात. मात्र सातत्याने होणाऱ्या वणव्यांमुळे येथील वनसंपदेवर गंभीर संकट ओढावले आहे. या आगीत मोठ्या प्रमाणावर वनस्पती जळाल्याने नैसर्गिक अधिवासाचे नुकसान झाले असून, वन्यजीवांच्या सुरक्षिततेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे गेल्या काही दिवसांत या परिसरात तीन बिबट्यांचे दर्शन झाल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान अशा प्रकारे वणवे सुरू राहिल्यास बिबट्यांसह अन्य वन्यप्राणी मानवी वस्तीत शिरण्याची शक्यता नाकारता येत नाही. नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे.

## शहापूर येथे विभागीय क्रीडा स्पर्धा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर :** * अपर आयुक्त, आदिवासी विकास ठाणे अंतर्गत विभागीय क्रीडा स्पर्धा सन 2025-26 या स्पर्धा एकलव्य रेसिडेन्शियल स्कूल, शेंडेगाव (भातसा नगर), ता. शहापूर, जि. ठाणे येथे दि. 18 डिसेंबर ते 20 डिसेंबर 2025 या कालावधीत पार पडणार आहेत. या विभागीय क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन लीना बनसोडे (भा.प्र.से.), आयुक्त आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य नाशिक आणि डॉ.श्रीकृष्ण पांचाळ (भा.प्र.से.), जिल्हाधिकारी ठाणे यांच्या हस्ते होणार आहे. तसेच बक्षीस वितरण दि.20 डिसेंबर 2025 रोजी डॉ.डी. एस.स्वामी (भा.पो.से.), ठाणे ग्रामीण पोलीस अधीक्षक आणि मनोज रानडे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांच्या उपस्थितीत होणार आहे.

या स्पर्धेत ठाणे विभागातील जव्हार प्रकल्प, डहाणू प्रकल्प, घोडेगाव प्रकल्प, पेण प्रकल्प, सोलापूर प्रकल्प व शहापूर प्रकल्प असे एकूण सहा प्रकल्पांतील सुमारे 2 हजार खेळाडू सहभागी होणार आहेत. विभागीय क्रीडा स्पर्धेत 14 वर्षे, 17 वर्षे व 19 वर्षे या वयोगटांसाठी कबड्डी, खो-खो, हॉलीबॉल, हँडबॉल व रिले असे सांघिक खेळ तसेच धावणे, उंच उडी, लांब उडी, गोळाफेक, थाळीफेक व भालाफेक या वैयक्तिक खेळांचा समावेश आहे. या स्पर्धांसाठी विविध वरिष्ठ शासकीय अधिकारी उपस्थित राहणार असून, या क्रीडा स्पर्धा गोपीचंद कदम (भा.प्र.से.), अपर आयुक्त, आदिवासी विकास ठाणे व दिवाकर काळपांडे, प्रभारी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, शहापूर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार आहेत. स्पर्धा यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी विविध समित्या स्थापन करण्यात आल्या असून त्यामध्ये सुमारे 200 अधिकारी कर्मचाऱ्यांवर जबाबदारी सोपविली आहे, असे दिपक आठवले, सहाय्यक आयुक्त (प्र.) आदिवासी विकास ठाणे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

### प्रचाराच्या शेवटच्या टप्प्यात

## अंबरनाथमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची सभा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ:** आज संपूर्ण मुंबई महानगर क्षेत्रात दोन लाख कोटींची कामे सुरू आहेत. मेट्रोच्या नेटवर्कच्या माध्यमातून अंबरनाथ, बदलापूरही शहरे जोडली जाणार आहेत. त्यातल्या कांजुरमार्ग ते बदलापूर या मेट्रो १४ चे काम येत्या चार महिन्यात सुरू होणार, अशी घोषणा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. अंबरनाथ नगर परिषद निवडणुकीच्या प्रचारासाठी अंबरनाथमध्ये फडणवीस बोलत होते.



मेट्रो ५, १२, १४ चा फायदा अंबरनाथ आणि बदलापूर शहरांना होणार आहे. मुंबई महानगर क्षेत्राचा विकास करायचा आहे. अंबरनाथ शहरासाठीही माझे काही स्वप्न आहेत. त्यासाठी आमच्या उमेदवाराला विजयी करा, असे आवाहनही फडणवीस यांनी यावेळी केले. यावेळी प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या शिंदेंच्या शिवसेनेवर टीका करणे मात्र त्यांनी टाळले.

अंबरनाथ नगर परिषदेच्या निवडणुकीच्या प्रचारासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बुधवारी अंबरनाथ शहरात आले होते. निवडणुका पुढे गेल्याने शिंदेंच्या शिवसेनेने शिमगा केला होता. त्याबाबत फडणवीस काय म्हणतात याकडे लक्ष लागले होते. मात्र निवडणूक पुढे गेल्याने मला अंबरनाथला येता आले असे सांगत फडणवीसांनी टोला लगावला.

अंबरनाथ हे मुंबईचे प्रवेशद्वार आहे. भाजपचा विकासाचा अजेंडा सांगण्यासाठी इथे आलो आहे, मी कुणावरही टीका करण्यासाठी आलेलो नाही, असे सांगत फडणवीस यांनी भाषणाच्या सुरूवातीलाच आपण शिवसेनेवर टीका करणार नाही हे स्पष्ट केले. यावेळी बोलताना रेल्वे, मेट्रो प्रकल्पांची माहिती देत त्याचा अंबरनाथ, बदलापुरला फायदा होणार असल्याचे त्यांनी सांगितले. कल्याण बदलापूर तिसरी चौथी मार्गिका झाल्यास दर दहा मिनिटाला लोकल मिळेल, असेही फडणवीस म्हणाले. सर्व साध्या लोकल वातानुकूलीत करण्यासाठी राज्य २३८ रॅक्सची मागणी करत आहोत. लवकरच सर्व लोकल कोणत्याही भाडेवाढीसह वातानुकूलीत होतील, असेही फडणवीस म्हणाले.

अंबरनाथमध्ये भाजपने नगराध्यक्ष पदाचा युवा आणि सुशिक्षित उमेदवार दिला आहे. त्या सनदी लेखापाल आहेत. त्या सर्व हिशोब ठेवतील आणि सर्वांचा हिशोब करतीलही, असे फडणवीस यावेळी म्हणाले. भाजप उमेदवारांची स्वप्ने ही माझे स्वप्ने असून ही स्वप्ने पूर्ण करण्यासाठी त्यांना निवडून द्या असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

फक्त नगराध्यक्ष नाही तर नगरसेवकही निवडून द्यायला हवेत, असेही त्यांनी आवर्जून सांगितले. यावेळी भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, वनमंत्री गणेश नाईक, आमदार किसन कथोरे, कुमार आयलानी, सुलभा गायकवाड, चित्रा वाघ, माजी मंत्री कपिल पाटील यांच्यासह भाजपचे उमेदवार आणि पदाधिकारी उपस्थित होते.

**गोळीबारावर भाष्य टाळले**

भाजपच्या उमेदवाराच्या कार्यालयावर झालेल्या घटनेवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस भाष्य करतील अशी अपेक्षा होती. मात्र फडणवीसांनी त्या विषयाला बगल देत, स्थानिक शिवसेना उमेदवारांसह शिवसेनेवर टीका टाळली. त्यामुळे आश्चर्य व्यक्त होते आहे.

## सात निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची नियुक्ती

### संवेदनशील केंद्रांवर सीसीटीव्ही नजर
### प्रशासन निवडणुकीसाठी सज्ज

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी, ता. १७ :** आगामी भिवंडी महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार कोकण विभागीय आयुक्त विजय सूर्यवंशी यांनी सात निवडणूक निर्णय अधिकारी आणि सात सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या नावांची घोषणा केली आहे. या अधिकाऱ्यांवर पालिकेतील पाच प्रभाग समित्यांच्या अंतर्गत होणारी निवडणूक प्रक्रिया पार पाडण्याची जबाबदारी असेल.

निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून शशिकांत गायकवाड (उपजिल्हाधिकारी, रोहयो, ठाणे), राहुल मुंडके (उपजिल्हाधिकारी, ठाणे), श्याम मुदनरकर (उपविभागीय अधिकारी, पालघर), अमित सानप (उपविभागीय अधिकारी, भिवंडी), गोपीनाथ ठोंबरे (उपमुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा), महेश हरिश्चंद्रे (उपजिल्हाधिकारी, मुंबई शहर), हर्षलता गेडाम (उपजिल्हाधिकारी, रोहयो, रत्नागिरी) यांची नियुक्ती केली आहे. निवडणुकीच्या कामासाठी पालिका यंत्रणा पूर्णपणे सज्ज झाली असून, गेल्या दोन दिवसांपासून मुख्यालयात अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या बैठकांचे सत्र सुरू आहे. प्रभाग समितीच्या सहाय्यक आयुक्तांकडून अहवाल मागवण्यात आला असून, त्यानंतर अंतिम मतदान केंद्रे निश्चित केली जातील. शहरातील संवेदनशील मतदान केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याचे नियोजन महापालिकेकडून करण्यात आले आहे.

## माणिकराव कोकाटेंविरोधात अटक वॉरंट जारी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

राज्याचे क्रीडामंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते माणिकराव कोकाटे यांच्याविरोधात नाशिक जिल्हा न्यायालयाने आज (दि.१७) सकाळी अटक वॉरंट जारी केले असून त्यांना कोणत्याही क्षणी अटक होण्याची शक्यता आहे. मंगळवारी झालेल्या सुनावणीवेळी नाशिक जिल्हा न्यायालयाने सदनिका घोटाळाप्रकरणातील त्यांची दोन वर्षांची शिक्षा कायम ठेवली होती. या शिक्षेच्या स्थगितीसाठी कोकाटे यांनी आज (दि.१७) उच्च न्यायालयात धाव घेतली होती. हायकोर्टाकडून दिलासा मिळेल अशी त्यांना अपेक्षा होती, पण या प्रकरणाची तातडीने सुनावणी घेण्यास कोर्टाने नकार दिला आहे.

**तातडीने सुनावणीस नकार**

बनावट कागदपत्रांच्या आधारे शासकीय सदनिका लाटल्याच्या प्रकरणात कोकाटे आणि त्यांचे बंधू विजय कोकाटे यांना नाशिक येथील प्रथमवर्ग न्यायालयाने दिलेली दोन वर्षांच्या कारावासाची शिक्षा सत्र न्यायालयाने कायम ठेवल्याने माणिकराव कोकाटे यांची आमदारकी व पर्यायाने मंत्रिपदही धोक्यात आले आहे. मंगळवारी जिल्हा न्यायालयाने शिक्षा कायम ठेवल्यानंतर या घोटाळाप्रकरणातील याचिकाकर्त्या -

**कधीही होऊ शकते अटक**

अंजली दिघोळ राठोड यांनी कोकाटे यांच्याविरोधात अटक वॉरंट जारी करण्यासाठी नाशिक जिल्हा न्यायालयात अर्ज दाखल केला होता. या अर्जावर आज युक्तिवाद होऊन न्यायालयाने माणिकराव कोकाटे यांच्याविरोधात अटक वॉरंट जारी केले. त्यानंतर शिक्षेला स्थगिती मिळावी यासाठी कोकाटेंनी हायकोर्टात धाव घेतली होती, पण कोर्टाने तातडीने सुनावणी घेण्यास नकार दिला आणि या प्रकरणाची सुनावणी शुक्रवारी होईल असे स्पष्ट केले आहे. त्यामुळे कोकाटेंवर अटकेची टांगती तलवार कायम आहे.




## ठाणे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदी रणजीत यादव

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाणे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदी रणजीत यादव (भा.प्र.से.) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. रणजीत यादव हे गडचिरोली येथे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प विभागात प्रकल्प अधिकारी आणि गडचिरोली उपविभागाचे साहाय्यक जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत होते. मागील अनेक महिन्यांपासून ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पद रिक्त होते.

ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांची जळगाव जिल्हाधिकारी पदी बदली झाल्यानंतर ठाणे जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी पद रिक्त होते. या पदाचा अतिरिक्त कार्यभार पालघर जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांच्याकडे सोपविण्यात आला होता. त्यामुळे ठाण्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी पदी कोणाची नियुक्ती होईल याची चर्चा रंगली होती. अखेर या पदावर रणजीत यादव यांची नियुक्ती झाली आहे. बुधवारी रणजीत यादव हे गडचिरोली येथे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प विभागात प्रकल्प अधिकारी आणि गडचिरोली उपविभागाचे साहाय्यक जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत होते. अपर मुख्य सचिव (सेवा) व्ही राधा यांनी बदली संदर्भाचे आदेश काढले आहेत.

## ठाण्याचा बालेकिल्ला काबीज करण्यासाठी काँग्रेस सज्ज

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाणे महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीचा बिगुल वाजला असून १५ जाने. रोजी मतदान होणार आहे. या पार्श्वभुमीवर ठाण्याचा "बालेकिल्ला" पुन्हा काबीज करण्यासाठी काँग्रेस ठाणे शहर - जिल्हाध्यक्ष ॲड. विक्रांत चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्ष सज्ज झाला आहे. गुरुवारी दि.१८ डिसेंबर २०२५ रोजी ठाणे काँग्रेसच्या मुख्य कार्यालयात १५० निष्ठावंत इच्छुकांच्या मुलाखती काँग्रेसची संसदीय समिती घेणार आहे.

ठाणे महापालिकेची सार्वत्रिक निवडणुक जाहिर झाली असुन ३३ प्रभागांमध्ये १३१ नगरसेवक निवडून येणार आहेत. यामुळे राजकिय हालचालींना प्रचंड वेग आला असुन सर्वच पक्षांमध्ये उमेदवारांची चाचपणी सुरू झाली आहे. महाविकास आघाडीत काँग्रेस हाच एकमेव राष्ट्रीय पक्ष असल्याने महायुतीच्या विरोधात कडवी लढत देण्यासाठी इच्छुकांची पहिली पसंती काँग्रेसलाच आहे. या अनुषंगाने काँग्रेसकडे उमेदवारांची रीघ लागली आहे. आत्तापर्यंत काँग्रेसकडे १५० जणांनी अर्ज दाखल केले आहेत. या पार्श्वभूमीवर ठाणे काँग्रेसच्या माध्यमातून इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती गुरुवारी दि.१८ डिसेंबर रोजी ठाणे काँग्रेसचे अध्यक्ष विक्रांत चव्हाण, ठाणे प्रभारी अतुल लोंढे, विधानसभा प्रभारी श्रीरंग बर्गे,

### काँग्रेसच्या १५० निष्ठावंत उमेदवारांच्या गुरुवारी मुलाखती

चंद्रकांत पाटील, अबिद खान तसेच काँग्रेसच्या जिल्हा निवड समितीतील सदस्यांच्या उपस्थितीत ठाणे काँग्रेसचे मुख्य कार्यालय येथे घेण्यात येणार आहेत. तरी सर्व इच्छुकांनी आपली व्यक्तीगत माहिती व प्रमाणपत्रांसह उपस्थित रहावे. असे आवाहन ठाणे शहर (जिल्हा) काँग्रेसचे अध्यक्ष ॲड. विक्रांत चव्हाण यांनी केले आहे.

ठाणे महापालिका निवडणुकीच्या मैदानात उतरण्यासाठी काँग्रेसकडे तब्बल १५० जणांनी उमेदवारीची मागणी केली आहे. याबाबत बोलताना ॲड. विक्रांत चव्हाण यांनी सांगितले की, पुर्वी 'ठाणे' हा काँग्रेसचा बालेकिल्ला होता, हा बालेकिल्ला पुन्हा काबीज करण्याचा चंग कार्यकर्त्यांनी बांधला आहे. तेव्हा केवळ काँग्रेसच्या निष्ठावंतांनाच निवडणुकीचे तिकिट दिले जाणार असुन इच्छुक उमेदवाराचे प्रभागातील काम, जनसंपर्क व पक्षाच्या कार्यक्रमामध्ये असलेला सक्रिय सहभाग याचा देखील विचार केला जाणार आहे. दरम्यान, काँग्रेसकडे एका एका प्रभागात अनेक इच्छुक असल्याने उमेदवारी देताना संसदीय समितीचा कस लागणार आहे.

## विज्ञान प्रदर्शनाबरोबरच भव्य शैक्षणिक प्रदर्शन व फूड फेस्टिव्हल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** पद्मश्री अण्णासाहेब जाधव भारतीय समाज उन्नती मंडळाच्या कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने विविध शैक्षणिक प्रदर्शन तसेच फूड फेस्टिव्हलचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला भिवंडी शहरातील विविध शाळा व महाविद्यालयांमधील हजारो विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात भेट दिली. या प्रदर्शनाचे उद्घाटन संस्थेचे सरचिटणीस आर. एन. पिंजारी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेचे सरचिटणीस ॲड. रोहित जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रदर्शनामध्ये विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या विविध शैक्षणिक व नावीन्यपूर्ण प्रकल्पांचे सादरीकरण करण्यात आले होते, तर फूड फेस्टिव्हलमध्ये विविध खाद्यपदार्थांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. संस्थेचे कार्याध्यक्ष बाळकृष्ण काळे यांनी प्रदर्शन व फूड फेस्टिव्हलला भेट देत विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे व मेहनतीचे विशेष कौतुक केले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते, असे त्यांनी यावेळी नमूद केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना व्यासपीठ मिळाल्याने शैक्षणिक वातावरण अधिक समृद्ध झाले. यावेळी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. शशिकांत म्हाळुंकर उपप्राचार्य डॉ. सुधीर निकम, डॉ. सुरेश भदरगे, डॉ. कुलदीप राठौड, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य एम ओ महाले, पर्यवेक्षक श्रीकांत पाटील, यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मयोगीसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, प्राणीशास्त्र, जीवशास्त्र, कला, वाणिज्य, विज्ञान तंत्रज्ञान, बायोटेक, मास मीडिया व एस एफ सी कॉमर्स विभागातील सर्व प्राध्यापकांनी विशेष परिश्रम घेतले.






# कल्याण डोंबिवली महानगरपालिका

**कल्याण डोंबिवली महानगरपालिका, सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६**

**-: अधिसूचना :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई ५९) मधील अनुसूची "ड" प्रकरण-१ निवडणूक नियम ८ अन्वये
क्रमांक- कडोंमपा/निवड/सार्व.नि. २०२५-२६/३२०, दिनांक १८/१२/२०२५

आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र मुंबई यांनी पत्र क्र. रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.८०/का.५, दि. १५ डिसेंबर, २०२५ अन्वये कल्याण डोंबिवली महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ करीता निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार मी, अभिनव गोयल, आयुक्त तथा निवडणुक अधिकारी, कल्याण डोंबिवली महानगरपालिका या अधिसूचनेद्वारे कल्याण डोंबिवली महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ साठी खालीलप्रमाणे कार्यक्रम जाहीर करीत आहे-

**परिशिष्ट - १**

| अ.क्र. | निवडणुकीचा टप्पा | टप्पा सुरु करण्याची/ पूर्ण करण्याची तारीख |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | नामनिर्देशनपत्र देण्याचा कालावधी | दि. २३ डिसेंबर, २०२५ (मंगळवार) ते दि. २९ डिसेंबर, २०२५ (सोमवार) (सकाळी ११ ते दुपारी ३) दि. ३० डिसेंबर, २०२५ (मंगळवार) (सकाळी ११ ते दुपारी २) (गुरुवार दि. २५ डिसेंबर, २०२५ व रविवार दि. २८ डिसेंबर, २०२५ रोजी नामनिर्देशनपत्रे देण्यात येणार नाहीत) |
| २ | वरील नामनिर्देशनपत्रे स्विकारण्याचा कालावधी | दि. २३ डिसेंबर, २०२५ (मंगळवार) ते दि. ३० डिसेंबर, २०२५ (मंगळवार) (सकाळी ११ ते दुपारी ३) (गुरुवार दि. २५ डिसेंबर, २०२५ व रविवार दि. २८ डिसेंबर, २०२५ रोजी नामनिर्देशनपत्रे स्विकारण्यात येणार नाहीत) |
| ३ | नामनिर्देशनपत्रांची छाननी | दि. ३१ डिसेंबर, २०२५ (बुधवार) (सकाळी ११.०० वाजल्यापासुन) |
| ४ | वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | छाननी पूर्ण झाल्यानंतर लगेच |
| ५ | उमेदवारी मागे घेण्याचा अंतिम दिनांक | दि. ०२ जानेवारी, २०२६ (शुक्रवार) पर्यंत (सकाळी ११ ते दुपारी ३) |
| ६ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा दिनांक | दि. ०३ जानेवारी, २०२६ (शनिवार) (सकाळी ११.०० वाजल्यापासुन) |
| ७ | अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | दि. ०३ जानेवारी, २०२६ (शनिवार) |
| ८ | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | दि. १५ जानेवारी, २०२६ (गुरुवार) (सकाळी ७.३० ते संध्याकाळी ५.३० पर्यंत) |
| ९ | मतमोजणी व निकाल जाहीर करण्याचा दिनांक | दि. १६ जानेवारी, २०२६ (शुक्रवार) (सकाळी १०.०० पासून |
| १० | शासन राजपत्रात निकाल प्रसिध्द करणे | दि. १९ जानेवारी, २०२६ (सोमवार) पर्यंत |

तसेच, मा.आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे कडील आदेश क्र. रानिआ/मनपा-२०२०/प्र.क्र.५/का-५, दि. ०६ ऑगस्ट, २०२५ व क्र. रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र./का-५, दि. २८ ऑगस्ट, २०२५ नुसार इकडील जा.क्र. कडोंमपा/निवड/सार्व.नि.२०२५-२६/३१७, दिनांक १७/१२/२०२५ च्या आदेशान्वये उपरोक्त निवडणुक कार्यक्रमानुसार जरुर ती कार्यवाही पार पाडण्यासाठी खालील तक्त्यातील रकाना क्रमांक चार मध्ये दर्शविलेल्या प्रभागांकरीता रकाना क्रमांक २ वरील अधिकाऱ्यांची निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून तसेच रकाना क्रमांक तीन मधील अधिकाऱ्यांची सहायक निवडणूक निर्णय अधिकारी क्रमांक १, २, ३ म्हणून नेमणूक करण्यात येत आहे.

| अ.क्र. | निवडणूक निर्णय अधिकारी | सहायक निवडणूक निर्णय अधिकारी क्र. १, २, ३ | प्रभाग क्रमांक | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयाचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | **श्री. महेश पाटील,**<br>उपजिल्हाधिकारी श्रीवर्धन जिल्हा, रायगड | **१. श्री. अभिजित देशमुख,**<br>तहसिलदार मुरबाड<br>**२. श्री. हरुण इनामदार,**<br>उप अभियंता, कडोंमपा.<br>**३. श्री. जयवंत चौधरी,**<br>सहायक आयुक्त,<br>१/अ प्रभागक्षेत्र कार्यालय, कडोंमपा. | २, ३, ४ | बिर्ला वन्य, केडीएमटी इमारत, तळ मजला, शहाड, कल्याण-मुरबाड रोड, साई निरवाना, इमारती जवळ, शहाड (प.) |
| २ | **श्रीम. अर्चना खेतमाळीस,**<br>उपजिल्हाधिकारी,<br>महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई | **१. श्री. के. जी. पाटील,**<br>नायब तहसिलदार महसूल, अंबरनाथ.<br>**२. श्री. मच्छिंद्र हंचाटे,**<br>उप अभियंता, कडोंमपा.<br>**३. श्रीम. प्रिती गाडे,**<br>सहायक आयुक्त,<br>२/ब प्रभागक्षेत्र कार्यालय, कडोंमपा. | १,५,६,१० | '२/ब' प्रभाग क्षेत्र कार्यालय, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, संघवी इस्टेट, बारावे रोड, कल्याण पश्चिम. |
| ३ | **श्री. राजु थोटे,**<br>उपजिल्हाधिकारी नोंदणी उपमहानिरिक्षक, मुंबई | **१. श्रीम. कविता देशमुख,**<br>नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय, कल्याण.<br>**२. श्री. सुनिल पाटील,**<br>उप अभियंता, कडोंमपा.<br>**३. श्री. धनंजय थोरात,**<br>सहायक आयुक्त,<br>३/क प्रभागक्षेत्र कार्यालय, कडोंमपा. | ७, ८, ९ | '३/क' प्रभाग क्षेत्र कार्यालय, अग्नीशमन केंद्राजवळ आधारवाडी, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण पश्चिम. |
| ४ | **श्री. वरुणकुमार सहारे,**<br>उपजिल्हाधिकारी (भुसंपादन),<br>मेट्रो सेंटर क्र ३ ठाणे | **१. श्रीम. स्वाती घोंगडे,**<br>तहसिलदार संगायो,<br>म.न.पा. क्षेत्र कल्याण.<br>**२. श्री. सचिन रामचंद्र घुटे,**<br>उप अभियंता (स्थापत्य),<br>कार्यरत विभाग नगररचना, कडोंमपा.<br>**३. श्रीम. सविता हिले,**<br>सहायक आयुक्त,<br>४/जे प्रभागक्षेत्र कार्यालय, कडोंमपा. | ११,१२,१८ | '४/जे' प्रभाग क्षेत्र कार्यालय, कल्याण डोंबिवली महानगरपालिका. भगवती अभिलाषा कन्व्हेंचर, धनलक्ष्मी अपार्टमेंट जवळ, लोकग्राम रेल्वे टिकीट काऊंटर समोर, लोकग्राम, कल्याण (पुर्व). |
| ५ | **श्री. अश्विनकुमार पोतदार,**<br>उपव्यवस्थापकीय संचालक,<br>सारथी, खारघर, नवी मुंबई. | **१. श्री. किशोर जाधव,**<br>नायब तहसिलदार,<br>विशेष भूसंपादन अधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे.<br>**२. श्री. राजू सगर,**<br>उप अभियंता, कडोंमपा<br>**३. श्री. उमेश यमगर,**<br>सहायक आयुक्त,<br>५/ड प्रभागक्षेत्र कार्यालय, कडोंमपा. | १३,१४,१५,१६ | '५/ड' प्रभाग क्षेत्र कार्यालय, कल्याण डोंबिवली महानगरपालिका (राष्ट्रसंत तुकडोजी महाराज प्रभाग कार्यालय), पुना लिंक रोड, काटेमानिवली, कल्याण पूर्व. |
| ६ | **श्रीम. आशा तामखेडे,**<br>उपजिल्हाधिकारी<br>(अति/निष्का), चेंबुर | **१. श्री. विनायक थवील,**<br>अपर तहसिलदार (अकृषीक), कुर्ला-१.<br>**२. श्री. अवधुत मदन,**<br>उप अभियंता, कडोंमपा.<br>**३. श्री. प्रसाद ठाकुर,**<br>सहायक आयुक्त,<br>६/फ प्रभागक्षेत्र कार्यालय, कडोंमपा. | २०,२६,२७,२८ | '६/फ' प्रभाग क्षेत्र कार्यालय, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, पीपी चेंबर, भगतसिंग रोड, डोंबिवली पूर्व. |
| ७ | **श्री. प्रशांत जोशी,**<br>उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी-२, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे. | **१. श्री. मधुकर जाधव,**<br>जनसंपर्क अधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे.<br>**२. श्री. अजय महाजन,**<br>उप अभियंता, कडोंमपा.<br>**३. श्री. भुषण कोकणे**<br>सहायक आयुक्त,<br>७/ह प्रभागक्षेत्र कार्यालय, कडोंमपा. | २१,२२,२३,२५ | '७/ह' प्रभाग क्षेत्र कार्यालय, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, रेतीबंदर रोड, उमेश नगर, २ पाण्याच्या टाकी जवळ, डोंबिवली पश्चिम |
| ८ | **श्रीम. निशाताई कांबळे,**<br>उपजिल्हाधिकारी (भूसंपादन)<br>जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी. | **१. श्री. अमित पुरी,**<br>तहसिलदार अंबरनाथ,<br>**२. श्री. दिलीप शिंदे,**<br>उप अभियंता, कडोंमपा.<br>**३. श्री. भारत पवार,**<br>सहायक आयुक्त,<br>८/ग प्रभागक्षेत्र कार्यालय, कडोंमपा. | २४,२९,३० | '८/ग' प्रभाग क्षेत्र कार्यालय, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, सुनिल नगर, डिएनसी रोड, बहिनाबाई उद्यानाच्या मागे, डोंबिवली पूर्व. |
| ९ | **श्री. जनार्दन कासार,**<br>उपजिल्हाधिकारी,<br>मेट्रो सेंटर क्र.१ पनवेल. | **१. श्री. नितिन बोडके,**<br>नायब तहसिलदार (संगायो),<br>तहसिल कार्यालय, कल्याण.<br>**२. श्री. राजेश वसईकर,**<br>उप अभियंता, कडोंमपा.<br>**३. श्री. सचिन तामखेडे,**<br>सहायक आयुक्त,<br>१०/ई प्रभागक्षेत्र कार्यालय, कडोंमपा | १७,१९,३१ | जलतरण तलाव येथील कार्यालय, ह.भ.प. सावळाराम महाराज म्हात्रे क्रीडा संकुल, घरडा सर्कल, डोंबिवली पूर्व. |

उपरोक्त निवडणूक निर्णय अधिकारी हे त्यांचेकडे निर्णयासाठी सुपूर्द करण्यात आलेल्या रकाना क्र.४ मधील संबंधीत प्रभागांची (Wards) नामनिर्देशनपत्रे (Nomination Forms) दिनांक २३/१२/२०२५ (मंगळवार) ते २९/१२/२०२५ (सोमवार) (सकाळी ११ ते दुपारी ३) या वेळेत रकाना क्र. ५ मध्ये नमूद केलेल्या निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात स्विकारतील. (गुरुवार दि. २५ डिसेंबर, २०२५ व रविवार दि. २८ डिसेंबर, २०२५ रोजी नामनिर्देशनपत्रे स्विकारण्यात येणार नाहीत)

कोणत्याही मतदारास छापील नामनिर्देशनपत्राचा संच (Set of Nomination Paper) परिशिष्ट १ मध्ये नमूद केलेल्या दिवशी विहीत वेळेत रु.१००/- प्रत्येकी या किंमतीत निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात विक्रीसाठी उपलब्ध करण्यात आले आहेत.

**ठिकाणः कल्याण**
**दिनांकः १८/१२/२०२५**

**जावक क्रमांक :**
**कडोंमपा/जसंवि/मुका/ ८०८**
**दिनांक : १७/१२/२०२५**

**सही/-**
**(अभिनव गोयल)**
**आयुक्त तथा निवडणूक अधिकारी,**
**कल्याण डोंबिवली महानगरपालिका.**

# आपल्या आयुष्याचे नाते सोशल मीडियावर ठरवू नये

## रिलेशनशिप कोच गायत्री पाटील यांचे आवाहन



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : सध्याच्या काळात सोशल मीडियामुळे जग जवळ आले आहे. प्रत्येकाच्या जीवनाचा तो भाग झाला असला, तरी आपल्या आयुष्यातील सोशल मीडियाचे स्थान प्रत्येकाने ठरवायला हवे. व्यक्तिगत जीवनात सोशल मीडियाचा अतिरेक करू नये. त्याचबरोबर सोशल मीडियाद्वारे नाते ठरवू नये, असे आवाहन रिलेशनशिप कोच गायत्री पाटील यांनी मंगळवारी येथे केले. डोंबिवलीत सुरू असलेल्या २१ व्या अखिल भारतीय आगरी महोत्सवात रिलेशनशिप कोच गायत्री पाटील यांची `तारुण्याच्या उंबरठ्यावर' या विषयावर अवनी पाटील यांनी मुलाखत घेतली त्यावेळी त्या बोलत होत्या.

भारतीय कुटुंब व्यवस्थेत नाती ही प्रत्येक व्यक्तीचे जीवन समृद्ध करतात. अनेक वर्षांपासून नात्यावर भारतीय संस्कृती टिकली. मात्र, आता अनेक कुटुंबांमध्ये नात्यांचे स्थान डळमळीत झाले आहे. प्रत्येक जण आपल्या आयुष्याचा विचार करीत आहे. परंतु, नाती टिकणे महत्वाचे आहे. छोट्या कारणांवरून घटस्फोटांचे प्रमाण वाढले आहे, ते चिंतेचे आहे, असे मत गायत्री पाटील यांनी व्यक्त केले. विवाह हा दोन व्यक्तींचा नसून, दोन संस्कृती, परंपरा आणि जीवन पद्धतीचा आहे. पती-पत्नीमध्ये भांडणात राग आल्यानंतर व्यक्त होण्यापूर्वी काही क्षण विचार करावा. समोरील व्यक्तीला गृहीत न धरता आपुलकीने संवाद साधावा, असे आवाहन गायत्री पाटील यांनी केले. एखादे पझल सोडविण्याच्या जिद्दीप्रमाणे आपण खूप वर्षासाठीचे नाते टिकविण्याचा प्रयत्न करावा, असे त्या म्हणाल्या.

प्रेमसंबंधातील `ब्रेकअप'नंतर अनेक मुले भावनिकदृष्ट्या खचतात. परंतु, एका `ब्रेकअप'ने जग संपलेले नाही, याची त्यांनी जाणीव ठेवावी. रडायला आले तर रडून आपल्या भावना मोकळ्या कराव्यात. त्यानंतर कुटुंबाबरोबर वेळ घालवून मन गुंतवून ठेवावे. तसेच स्वतःच्या आयुष्याला नवी संधी द्यावी. तुमच्या चुका लक्षात घेऊन भविष्यात सुधारणा करावी. आपले जीवन पुढे सुरू ठेवताना तुमच्या पूर्वीची प्रेयसी-प्रियकराच्या आयुष्यात डोकावण्याचा प्रयत्न करू नका. मन खचल्यानंतर आयुष्य पूर्वपदावर आणण्यासाठी रिलेशनशिप कोचची मदत घ्यावी, असे आवाहन गायत्री पाटील यांनी केले.

# नावझे ग्रामपंचायतीत आरोग्य शिबिराचे आयोजन



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पालघर** : मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान आणि माझी वसुंधरा अभियान 6.0 अंतर्गत ग्रामपंचायत नावझे येथे भव्य मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात मोफत नेत्र तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया, सर्वसाधारण आरोग्य तपासणी तसेच औषध वितरण करण्यात आले.

हा स्तुत्य उपक्रम जागवू संवेदना सेवाभावी संस्था, मांडे, भक्ती वेदांत ट्रस्ट (मिरा रोड), निरामय फाउंडेशन (वाडा) आणि रोटरी क्लब ऑफ बॉम्बे यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आला.

कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेच्या अध्यक्ष वंदना परशुराम पाटील मॅडम यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते वझे गुरुजी, अभय वर्तक, पंकज वर्तक, विक्रम पडके, रोहन राऊत, अशोक सर (सरपंच, ग्रामपंचायत नावझे), ग्रामपंचायत सदस्य, ग्रामविकास अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या आरोग्य शिबिराला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शिबिरामध्ये 100 पेक्षा अधिक रुग्णांनी मोफत आरोग्य तपासणी करून घेतली, तर 15 रुग्णांवर यशस्वीपणे मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आली. यासोबतच गरजू रुग्णांना मोफत औषधांचे वितरण देखील करण्यात आले.

या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्य सुविधा थेट दारात उपलब्ध झाल्याने समाधान व्यक्त करण्यात आले. आयोजक संस्थांनी राबवलेल्या या सामाजिक उपक्रमाचे ग्रामस्थांकडून भरभरून कौतुक करण्यात आले.

# प्रशीक सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी संस्थेची सर्वसाधारण सभा



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : प्रशीक सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा कल्याण येथे नियोजनबद्ध पध्दतीने निवृत्त न्यायमूर्ती अनिल वैद्य यांच्या प्रमुख उपस्थितीत नुकतीच पार पडली. बौध्द समाजाची सामाजिक स्थिती आणि बौद्ध समाजाची आर्थिक स्थिती यावर सेवानिवृत्त सहसचिव शुध्दोधन आहेर यांनी मुद्देसूद आणि समाजातील जे शिकले पुढे गेले त्यांनी नेमके काय केले पाहिजे हे योग्य पद्धतीने सभेपुढे मांडले. त्यात कृषी विद्यापीठ दापोली सेवानिवृत्त उपसंचालक डॉ आनंद नरलंगकर, यांनीही त्यांचे अनुभव आणि आपली जबाबदारी यावर प्रकाश टाकला.

डॉ दिनकरराव म्हसदे यांनी त्यांचे निरनिराळ्या पदांवर काम करीत असतानाचे अनुभव कथन केले. बौध्दांची धार्मिक स्थिती ह्या अतिशय जिव्हाळ्याचे विषयावर सेवानिवृत्त सहसचिव सुरेश सोनावणे यांनी अभ्यासपूर्ण विवेचन करतांना बौध्दांनी नेमके कशापध्दतीने धम्माचे आचरण करावे या संबंधी सविस्तर चर्चा केली. न्यायमुर्ती अनिल वैद्य यांनी सुध्दा बौध्द धम्माच्या स्थिती बाबत आणि बौध्द विवाह कायदा करण्यासाठी जे राज्य शासनाने समिती नेमली होती तिथे रोखठोक डॉ बाबासाहेब आंबेडकरांची बाजू मांडल्यामुळे समितीवरन कसे हटवले तेही सांगितले. सभेचे अध्यक्ष यशवंत गायकवाड यांनी सभागृहात उपस्थित असलेल्या सर्व सदस्यांकडून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी 14 ऑक्टोबर 1956 रोजी दिलेल्या 22 प्रतिज्ञा वदवून घेतल्या.

## ठाणे महानगरपालिका, ठाणे

अधिसूचना

राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र

ज्याअर्थी, विद्यमान ठाणे महानगरपालिकेची मुदत दिनांक ०५.०३.२०२२ रोजी संपलेली आहे, आणि :

ज्याअर्थी, मा. राज्य निवडणूक आयोगाने त्यांचे आदेश क्रमांक रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.८०/का-५, दिनांक १५.१२.२०२५ अन्वये निवडणुकीचा कार्यक्रम निश्चित करुन तो अधिसूचित करणेबाबत निर्देश दिलेले असून, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, कलम १४ (२) चे अधिकार महापालिका आयुक्त, यांना प्रदान करीत आहे.

त्याअर्थी, मी, सौरभ राव, आयुक्त, ठाणे महानगरपालिका, मला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची प्रकरण १ निवडणूक नियमाखालील नियम ८ अन्वये ठाणे महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक -२०२५ साठी प्रभाग क्र.१ ते ३३ च्या निवडणुकी साठी खालीलप्रमाणे निवडणूक कार्यक्रम अधिसूचित करीतआहे :-

| अ.क्र. | निवडणुकीचा टप्पा | टप्पा सुरु करण्याची/पूर्ण करण्याची तारीख |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | मतदार यादी ग्राह्य धरण्याचा दिनांक | दि.१ जुलै, २०२५ (मंगळवार) |
| १. | नामनिर्देशनपत्र देण्याचा कालावधी | दि.२३ डिसेंबर, २०२५ (मंगळवार) ते दि.२९ डिसेंबर, २०२५ (सोमवार) (सकाळी ११ ते दुपारी ३)<br>दि.३० डिसेंबर, २०२५ (मंगळवार) (सकाळी ११ ते दुपारी २)<br>(गुरुवार दि.२५ डिसेंबर, २०२५ व रविवार दि.२८ डिसेंबर, २०२५ रोजी नामनिर्देशनपत्र देण्यात येणार नाहीत.) |
| २. | वरील नामनिर्देशनपत्र स्वीकारण्याचा कालावधी | दि.२३ डिसेंबर, २०२५ (मंगळवार) ते दि.३० डिसेंबर, २०२५ (मंगळवार) (सकाळी ११ ते दुपारी ३)<br>(गुरुवार दि.२५ डिसेंबर, २०२५ व रविवार दि.२८ डिसेंबर, २०२५ रोजी नामनिर्देशनपत्र स्विकारण्यात येणार नाहीत.) |
| ३. | नामनिर्देशनपत्रांची छाननी | दि.३१ डिसेंबर, २०२५ (बुधवार) (सकाळी ११.०० वाजल्यापासून) |
| ४. | वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | छाननी पूर्ण झाल्यानंतर लगेच |
| ५. | उमेदवारी मागे घेण्याचा अंतिम दिनांक | दि.०२ जानेवारी, २०२६ (शुक्रवार) पर्यंत<br>(सकाळी ११ ते दुपारी ३) |
| ६. | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा दिनांक | दि.०३ जानेवारी, २०२६ (शनिवार)<br>(सकाळी ११.०० वाजल्यापासून) |
| ७ | अंतिमरित्या निवडणूक लढविणा-या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | दि.०३ जानेवारी, २०२६ (शनिवार) |
| ८. | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | दि.१५ जानेवारी, २०२६ (गुरुवार)<br>(सकाळी ७.३० ते संध्याकाळी ५.३० पर्यंत) |
| ९. | मतमोजणी व निकाल जाहीर करण्याचा दिनांक | दि.१६ जानेवारी, २०२६ (शुक्रवार)<br>(सकाळी १०.०० पासून) |
| १०. | महाराष्ट्र शासन राजपत्रात निकाल प्रसिध्द करणे | दि.१९ जानेवारी, २०२६ (सोमवार) पर्यंत |

प्रस्तुत, सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रभाग निहाय खालीलप्रमाणे निवडणूक निर्णय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली असून, संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयातून वरील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे नामनिर्देशनपत्र देणे, स्वीकारणे, नामनिर्देशनपत्रांची छाननी करणे तसेच निवडणूक चिन्हांचे वाटप करणे व निवडणुकी संदर्भातील इतर सर्व कामकाज पार पाडण्याची कार्यवाही करण्यात येईल.निवडणूक निर्णय अधिकारी/सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांचे नाव, हुद्दा व त्यांचे कार्यालयाचा पत्ता खालीलप्रमाणे आहे :-

| अ. क्र. | निवडणूक निर्णय अधिकारी | सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी १,२ व ३ | नेमून दिलेले प्रभाग | प्रभाग समिती | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयाचा पत्ता |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्रीम. शारदा पोवार, उपजिल्हाधिकारी (भुसंपादन), सिंधुदूर्ग | १. श्री. आशिषकुमार बिरादार, तहसीलदार (संगायो), म.न.पा. क्षेत्र, ठाणे.<br>२. श्रीम. सोनल काळे, सहाय्यक आयुक्त, ठा.म.पा. (७७६९०४९००९)<br>३. श्री. संजय कदम, कार्यकारी अभियंता, ठा.म.पा. (९८२०२५८२६७) | १, २, ३, ८ | माजिवडा मानपाडा प्रभाग समिती | माजिवडा-मानपाडा प्रभाग समिती कार्यालय व न्यू होरायझन एज्युकेशन सोसायटी, इमारत सी, रोडाझ सोसा.जवळ हिरानंदानी इस्टेट, ठाणे (प.) |
| २. | श्रीम. सत्वशीला शिंदे, उपजिल्हाधिकारी, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड, मुंबई | १. श्री. उमेश पाटील तहसीलदार, ठाणे<br>२.श्री. गणेश चौधरी, सहाय्यक आयुक्त, ठा.म.पा. (९६७३४४००६)<br>३.श्री. रणधीर राणे, कार्यकारी अभियंता, ठा.म.पा.(९६१९४४०३४७) | ४, ५, ७ | वर्तकनगर प्रभाग समिती | ज्येष्ठ कवि,साहित्यीक स्व. बाबुराव सरनाईक जिम्नॅशियम सेंटर, बेथनी हॉस्पीटल समोर, पोखरण रोड नं-२, ठाणे (प.) |
| ३. | श्री. सर्जेराव म्हस्के पाटील, उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन), ठाणे | १.श्री. गोविंद वाकडे तहसीलदार (पुनर्वसन), जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड<br>२. श्री. सोमनाथ बनसोडे सहाय्यक आयुक्त, ठा.म.पा. (८६००४७१६८७)<br>३.श्री. संदीप सावंत, कार्यकारी अभियंता, ठा.म.पा. (९८६७३२०८५२) | ६, १३, १४, १५ | लोकमान्यनगर सावरकरनगर प्रभाग समिती | महिला बचत गट भवन, कोरस हॉस्पीटल जवळ, ठाणे (प) |
| ४. | श्रीम.वृषाली पाटील उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, धारावी पुर्नविकास प्रकल्प, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई | १. श्री. संदीप थोरात तहसीलदार, (संगायो), जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे<br>२. श्री. सोपान भाईक, सहाय्यक आयुक्त, ठा.म.पा. (९९८७४७०६९८)<br>३.श्री. रविशंकर शिंदे, कार्यकारी अभियंता,ठा.म.पा. (८१०८२०७१२९) | १६, १७, १८ | वागळे प्रभाग समिती | शासकीय तंत्रनिकेतन, वागळे इस्टेट, ठाणे (प.) |
| ५. | श्रीम. प्रज्ञा सावंत सहा.नोंदणी महानिरिक्षक,का.अ. क्र.१३ प्रधान मुद्रांक जिल्हा कार्यालय, अंधेरी | १. श्री. डी.बी.पैठणकर निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, ठाणे (९९६७८३९५११)<br>२. श्री. महेश जामनोर, सहाय्यक आयुक्त, ठा.म.पा. (९८२३५८५६२८)<br>३. श्री. विवेकानंद रघुनाथ कारंडे , कार्यकारी अभियंता, ठा.म.पा. (९१६७२५१०२९) | १९, २०, २१, २२ | नौपाडा- कोपरी प्रभाग समिती | दादोजी कोडंदेव स्टेडीयम,बिलियर्डस सेक्शन पहिला मजला महागिरी, ठाणे (प.) |
| ६. | श्रीम. उर्मिला पाटील उपविभागीय अधिकारी, ठाणे | १.श्री. गोरख फडतरे, नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, ठाणे<br>२. श्री. मोहन कलाल, कार्यकारी अभियंता, ठा.म.पा (९९२०३३५१५५)<br>३. श्री. केशव कांबळे कार्यकारी अभियंता, ठा.म.पा. (९७०२३६९८०३) | १०, ११, १२ | उथळसर प्रभाग समिती | उथळसर प्रभाग समिती कार्यालय व हॉली क्रॉस कॉन्व्हेन्ट हायस्कुल, ठाणे (प.) |
| ७. | श्रीम. अश्विनी पाटील उपजिल्हाधिकारी, सक्षम प्राधिकरण-३, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे | १. श्री. नंदकिशोर देशमुख, तहसीलदार, सक्षम प्राधिकारी क्र.४, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बांद्रा<br>२. श्रीम. ललिता जाधव, सहाय्यक आयुक्त, ठा.म.पा. (९७०२९४८८७९)<br>३. श्री. प्रशांत फिरके, कार्यकारी अभियंता, ठा.म.पा. (७७३८३६६८६२) | ९, २३, २४, २५ | कळवा प्रभाग समिती | कळवा प्रभाग समिती कार्यालय व सह्याद्री हायस्कूल, ४ था मजला, कळवा (प.) |
| ८. | श्री. गोपीनाथ ठोंबरे उपमुख्यकार्यकारी अधिकारी (पणन), म्हाडा, मुंबई | १. श्री. श्रीधर गालीपेल्ली, तहसीलदार, सक्षम प्राधिकारी ९, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बांद्रे, मुंबई उपनगर<br>२.श्री. विजय कावळे, सहाय्यक आयुक्त, ठा.म.पा. (७८२०९०५८६८)<br>३. श्री. नदीम काजी, कार्यकारी अभियंता, ठा.म.पा. (८८७९४४९८७९) | २६, ३१ | मुंब्रा प्रभाग समिती | मौलाना अब्दुल कलाम स्टेडियम, कौसा, बॅटमिंटन हॉल, तळ मजला, मुंब्रा |
| ९. | श्री. अविनाश कोष्टी उपजिल्हाधिकारी, संजय गांधी योजना, जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर | १. श्री. पुरुषोत्तम थोरात, विशेष कार्यकारी दंडाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे<br>२. श्री. धनाजी मोदे कार्यकारी अभियंता, ठा.म.पा (९८९२१५७८७८)<br>३. श्री. महेश बहिरम कार्यकारी अभियंता, ठा.म.पा. (९९६९२०१६१९) | ३०, ३२ | मुंब्रा प्रभाग समिती | मौलाना अब्दुल कलाम स्टेडियम, कौसा, बॅटमिंटन हॉल, पहिला मजला, मुंब्रा |
| १०. | श्री. सुनिल शिंदे उपजिल्हाधिकारी, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई | १. श्री. विपीन लोहकरे, तहसीलदार (करमणूक), जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे<br>२.श्री. शिवप्रसाद नागरगोजे, सहाय्यक आयुक्त, ठा.म.पा. (७७३८८४२९२५)<br>३. श्री. महेश अमृतकर, कार्यकारी अभियंता, ठा.म.पा. (९९३०८८८०२४) | २७, २८ | दिवा प्रभाग समिती | मौलाना अब्दुल कलाम स्टेडीयम, प्रेक्षक गॅलरी, तळ मजला + प्रेक्षक गॅलरीची मागील बाजू (पहिला मजला) दक्षिण बाजूकडील सात गाळे, मुंब्रा |
| ११. | श्री.विरसिंग वसावे सह. जिल्हा निबंधक वर्ग-१, रत्नागिरी, जिल्हा - रत्नागिरी | १. श्री.विक्रम पाटील तहसीलदार, अलिबाग<br>२. श्री. सचिन बोरसे सहाय्यक आयुक्त, ठा.म.पा. (८८७९०२४८४९)<br>३. श्री. दीपक माने कार्यकारी अभियंता, ठा.म.पा. (९८९२७९७९१०) | २९,३३ | दिवा प्रभाग समिती | मौलाना अब्दुल कलाम स्टेडीयम, प्रेक्षक गॅलरी, तळ मजला + प्रेक्षक गॅलरीची मागील बाजू (पहिला मजला) उत्तर बाजूकडील सात गाळे, कौसा, मुंब्रा |

२. ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील ३३ प्रभागांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी "आचार संहिता पथक" स्थापन करण्यात येत असून त्यात खालील अधिकाऱ्यांचा समावेश असेल.

| अ.क्र. | आचार संहिता पथक | कार्यक्षेत्र | कार्यालयाचा पत्ता |
|---|---|---|---|
| १. | १. श्री. भालचंद्र बेहरे (पथक प्रमुख) उपआयुक्त, परिवहन<br>२. श्रीम.वैशाली लंभाते, उपजिल्हाधिकारी (विशेष कक्ष २ ), पश्चिम उपनगरे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,बृहन्मुंबई.<br>३. श्रीम.प्रिया जांभळे पाटील, तहसीलदार महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई | ठाणे महानगरपालिका क्षेत्र एकूण १ ते ३३ प्रभाग | लोकमान्यनगर प्रभाग समिती कार्यालय, ३ रा मजला, ठाणे महानगरपालिका, ठाणे |

३. ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील ३३ प्रभागांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी "उमेदवारी खर्च व हिशेब तपासणी पथक" स्थापन करण्यात येत असून त्यात खालील अधिकारी-कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ.क्र | उमेदवारी खर्च व हिशेब तपासणी पथक प्रमुख | कार्यक्षेत्र | कार्यालयाचा पत्ता |
|---|---|---|---|
| १. | १. श्री. दिलीप सुर्यवंशी (पथक प्रमुख ) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, ठा.म.पा.<br>२. श्री. जितेंद्र इंगळे, मुख्य लेखा परिक्षक<br>३. श्री.चांगदेव वीर, लेखाधिकारी, शिक्षण विभाग | ठाणे महानगरपालिका क्षेत्र एकूण १ ते ३३ प्रभाग | वर्तकनगर प्रभाग समिती कार्यालय, २ रा मजला, ठाणे महानगरपालिका, ठाणे |

ठिकाण : ठाणे
दिनांक : १८.१२.२०२५
ठामपा/पिआरओ/निवडणूक/१०५७/२०२५-२६
दि:१८.१२.२०२५
**Pls visit our official web-site**
**www.thanecity.gov.in**

सही/-
सौरभ राव, भाप्रसे
निवडणूक अधिकारी तथा
प्रशासक तथा महापालिका आयुक्त,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

**अनधिकृत बांधकामाला आळा घाला..**
**अनधिकृत बांधकाम दिसल्यास प्रभाग समितीत तक्रार करा !**

### हुतात्मा भाई कोतवाल व हिराजी पाटील यांच्या बलिदान दिना निमित्त

# सिद्धगड येथे देशभक्तीपर कार्यक्रम

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुरबाड(दिलीप पवार) :** हुतात्मा वीर भाई कोतवाल व हुतात्मा वीर हिराजी पाटील यांच्या बलिदान दिना निमित्त सिद्धगड स्मारक समिती मुरबाड तर्फे तालुक्यातील सिद्धगड येथे विविध प्रकारचे देशभक्तीपर कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत 1 जानेवारी 2026 रोजीच्या सायंकाळपासून दोन जानेवारीच्या सकाळपर्यंत हे कार्यक्रम होणार आहेत

भारतीय स्वातंत्र्य लढ्यात सहभागी झालेल्या हुतात्मा हिराजी पाटील व हुतात्मा भाई कोतवाल यांना सिद्धगड येथील डोंगराच्या कपारी मध्ये ब्रिटिशांनी केलेल्या गोळीबारात 2 जानेवारी 1943 रोजी पहाटे सहा वाजून दहा मिनिटांनी वीर गती प्राप्त झाली होती. त्यांच्या पवित्र स्मृतींना अभिवादन करण्यासाठी दरवर्षी 2 जानेवारी रोजी पहाटे सहा वाजून दहा मिनिटांनी त्या ठिकाणी उभारलेली क्रांतीज्योत प्रज्वलित करून अभिवादन करण्यात येते सिद्धगडावर 2 जानेवारी 1943 रोजी झालेला लढा यावर्षी पुन्हा नाट्यरूपाने ( सिद्धगडावरील रणसंग्राम ) दोन जानेवारीच्या पहाटे सादर केला जाणार आहे.

या निमित्ताने विद्यार्थ्यांच्या वकृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत त्यासाठी खाली दिलेल्या दोन विषयांपैकी एका विषयावर भाषण करायचे आहे इयत्ता पहिली ते दहावीसाठी चार मिनिटाचा वेळ देण्यात आला आहे



इयत्ता पहिली ते चौथी 1) वीर हुतात्मा भाई कोतवाल 2 ) वीर हुतात्मा हिराजी पाटील

इयत्ता पाचवी ते सातवी 1 )आझाद दस्त्याचे शिलेदार 2 ) क्रांतिवीर गोमाजी पाटील


इयत्ता आठवी ते दहावी 1) स्वातंत्र्य पंढरी सिद्धगड 2 ) आजाद दस्त्याची गाथा

जूनियर कॉलेज व खुला गट 1 ) सिद्धगड देशभक्तीचे क्रांतीपीठ 2 ) सिद्धगडचा आदर्श लढा या गटासाठी भाषण करण्यास पाच मिनिटांचा वेळ देण्यात आला आहे.

हुतात्मा भाई कोतवाल यांनी भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी कोतवाल दस्त्याची स्थापना केली होती त्यावेळी या क्रांतिकारकांनी वीज वाहक पायनल जमीन दोस्त करणे , रेल्वेचे रूळ कापणे अशी कामे करून ब्रिटिशांना सळो की पळो करून सोडले होते ब्रिटिशांविरुद्ध लढा देत असताना 2 जानेवारी 1943 रोजी मुरबाड तालुक्यातील सिद्धगड येथे भाई कोतवाल व हिराजी पाटील हे दोन क्रांतिकारक ब्रिटिशांच्या गोळीबारात हुतात्मा झाले होत.

स्वातंत्र्य सैनिक हरिभाऊ भडसावळे यांनी या ठिकाणाचा शोध घेऊन या क्रांतिकारकांची आठवण म्हणून 1946 पासून सिद्धगडाच्या जंगलात ज्या ठिकाणी या दोन क्रांतीकारकांना वीरमरण आले त्या ठिकाणी त्याच वेळी या हुतात्म्यांना आदरांजली वाहण्याची प्रथा सुरू केली त्यावेळी त्यांचे बरोबर अनेक स्वातंत्र्य सैनिक तेथे उपस्थित राहत होते या ठिकाणी होणाऱ्या कार्यक्रमासाठी दरवर्षी ठाणे व रायगड जिल्ह्यातील शेकडो देश प्रेमी नागरिक उपस्थित असतात. सिद्धगड हे ठिकाण मुरबाड पासून 25 किलोमीटर अंतरावर भीमाशंकर अभयारण्यातील जंगलात आहे तेथे 1 जानेवारीच्या सायंकाळ पासून 2 जानेवारीच्या सकाळ पर्यंत विद्यार्थ्यांच्या वकृत्व , समूहगान स्पर्धा, पोवाडे, नाटिका, गीत गायन असे देशभक्तिपर कार्यक्रम होणार असल्याची माहीती सिद्धगड स्मारक समितीचे अध्यक्ष माजी आमदार गोटीराम पवार यांनी दिली.

ठाणे व रायगड जिल्ह्यातील शाळा कॉलेजचे विद्यार्थी व ठाणे , रायगड , पुणे , नगर जिल्ह्यातील स्वातंत्र्य प्रेमी नागरिक कार्यक्रमास हजर राहतात.





# मनसेच्या माजी नगरसेविका कस्तुरी देसाई आणि माजी शहर अध्यक्ष कौस्तुभ देसाई यांचा पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेची निवडणूक जाहीर झाली असून राजकारण तापू लागले आहे. निवडणूक जाहीर होण्यापूर्वीच अनेकांनी विविध पक्षात प्रवेश केले आहेत. अशातच महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या माजी नगरसेविका तथा महिला शहरअध्यक्षा कस्तुरी देसाई आणि त्यांचे पती मनसेचे माजी शहर अध्यक्ष कौस्तुभ देसाई यांनी आपल्या मनसे पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. यामुळे मनसेला मोठा धक्का बसला आहे. सध्याची राजकीय परिस्थिती, प्रभागातील चित्र पाहता आपण जनतेच्या हितासाठी पक्ष सोडण्याचा निर्णय घेतल्याची माहिती यावेळी



कौस्तुभ देसाई यांनी दिली आहे. तर पक्ष नेतृत्वावर किंवा स्थानिक पदाधिकाऱ्यांवर आपली कोणतीही नाराजी नसून मनसेमुळेच आपल्याला ओळख मिळाल्याची भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली. तर शिवसेनेमध्ये प्रवेश करायचा की भाजपमध्ये याबाबत अद्याप कोणताही निर्णय झालेला नसून कार्यकर्त्यांशी बोलून दोन दिवसांत अंतिम निर्णय घेऊ असेही कौस्तुभ आणि कस्तुरी देसाई यांनी स्पष्ट केले. दरम्यान कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत मनसेचे ९ नगरसेवक होते यातील ७ जणांनी शिवसेना शिंदे गट आणि भाजपामध्ये प्रवेश केला असून आता फक्त सुनंदा कोट आणि तृप्ती भोईर या दोन नगरसेविका मनसेत राहिल्या आहेत.

# वीरशैव लिंगायत समाजाचा वधू वर पालक परिचय मेळावा

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**शहापूर ग्रामीण( नरेंद्र पाटील)** : सध्याच्या धावपळीच्या युगामध्ये पालकांना वेळ कमी मिळत असल्यामुळे व विखुरलेला समाज असल्यामुळे लग्न जमवण्यासाठी विलंब होत असतो अशा या समाजातील पालकांसाठी व वधू-वरांसाठी महाराष्ट्र वीरशैव लिंगायत सभा ठाणे व वीरशैव लिंगायत सेवा संस्था ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने 36 वा वधू वर पालक परिचय मेळावा रविवार दि. 28/ 12/ 25 रोजी कल्याण लालचौकी येथील शारदा मंदिर हॉलमध्ये सकाळी दहा वाजता आयोजित करण्यात आला आहे तरी या परिचय मेळाव्यासाठी डॉ. सुभाष आवटे( निवृत्त आयपीएस अधिकारी ) रवी पाटील( शिवसेना शहर प्रमुख कल्याण) मनीषा वाळेकर ( माजी नगराध्यक्षा अंबरनाथ ) अनंत शेठ गवळी ( संचालक- अनंत हलवाई कल्याण) तुषार बेंबळकर, चंद्रशेखर होनराव आदी मान्यवर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

तरी या वधू वर पालक परिचय मेळाव्यासाठी सर्व पालकांना परवानगी देण्यात येणार आहे तरी पालकांनी येताना दोन पासपोर्ट साइजचे फोटो सोबत आणावेत यासाठी वीरशैव- लिंगायत सेवा संस्थेचे अध्यक्ष शांत कुमार लच्चाने, सचिव- सिद्राम बालूरे, सरचिटणीस - श्रीमती विद्या कापसे, कार्याध्यक्ष - प्रदीप निलाखे, उपाध्यक्ष बसवंतराव अळळाली, खजिनदार चंद्रकांत संन्ना वीरभद्रप्पा, शिवानंद संकपाळ, प्रमिला लंबे यांनी केले आहे तरी वीरशैव- लिंगायत धर्मातील सर्व पोट जातीतील इच्छुक वधू-वरांनी व पालकांनी या मेळाव्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन केले आहे.

# ठाणे मनपा शिक्षण विभाग आयोजित विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे (16)** : सामाजिक पर्यावरणास अनुकूल आणि सध्याच्या काळाची गरज लक्षात घेऊन "विकसित आणि आत्मनिर्भर भारतासाठी स्टेम" या विषयाला अनुसरून शाश्वत शेती, कचरा व्यवस्थापन आणि प्लास्टिकला पर्याय, हरित ऊर्जा, उद्योन्मुख तंत्रज्ञान, मनोरंजक गणितीय मॉडेलिंग, आरोग्य आणि स्वच्छता, जलसंवर्धन आणि व्यवस्थापन यावर आधारित तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात नाविन्यपूर्ण प्रकल्प सादर करुन विद्यार्थ्यांनी उपस्थितांकडून कौतुकाची थाप मिळविली. ठाणे महानगरपालिका शिक्षण विभाग ठाणे आयोजित 53 व्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन आज (दिनांक 16 डिसेंबर 2025) उत्साहात पार पडले. हे प्रदर्शन ठाणे मनपा शाळा क्रमांक 115 कळवा येथे आयोजित करण्यात आले आहे. या विज्ञान प्रदर्शनामध्ये ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व महानगरपालिका शाळा, गट स्तरावर निवड झालेल्या खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळा अशा एकूण 127 शाळांमधील विद्यार्थ्यांनी आपले नाविन्यपूर्ण प्रकल्प सादर केलेले आहेत. यावर्षी एनसीईआरटी नवी



दिल्ली यांच्या संदर्भीय निर्देशांन्वये विज्ञान प्रदर्शनाचा "विकसित आणि आत्मनिर्भर भारतासाठी स्टेम" हा मुख्य विषय निश्चित करण्यात आला होता.

विज्ञान प्रदर्शनास शिक्षण उपायुक्त सचिन सांगळे, प्रमुख अतिथी म्हणून बी. एन. बांदोडकर महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. प्रल्हाद वाघ, गट अधिकारी संगिता वामणे, यु. आर. सी. प्रमुख रविंद्र पाटील व मुश्ताक पठाण, लेखाधिकारी

### विज्ञान प्रदर्शनात "विकसित आणि आत्मनिर्भर भारतासाठी स्टेम" नाविन्यपूर्ण प्रकल्प

चांगदेव वीर तसेच सर्व गटप्रमुख व मुख्याध्यापक इत्यादी मान्यवर उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी मांडलेल्या नाविन्यपूर्ण प्रकल्पांचे परीक्षण करण्यासाठी विद्या कदम, प्रा. हेमराज बराटे व सुनिल जाधव यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

प्रमुख अतिथी डॉ. प्रल्हाद वाघ यांनी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रकल्पांचे व विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांना अधिकाधिक चिकीत्सक विचार करण्यासाठी प्रेरित केले. तसेच शिक्षण विभागाचे उपायुक्त सचिन सांगळे साहेब यांनी दैनंदिन जीवनातील विज्ञानाची व्यापकता, मानवाने आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर केलेला 'अश्मयुग ते आधुनिक युग' असा प्रवास व सध्याच्या टेक्नॉलॉजी सारख्या क्षेत्रात भारताची निर्णायक वाटचाल अशा विविध विषयावर विद्यार्थी व शिक्षकांना मार्गदर्शन केले. सदर प्रदर्शन सर्वांना पाहण्यासाठी 17 डिसेंबरपर्यंत रोजी खुले असणार आहे. गट क्र. 8 च्या गटप्रमुख अनघा पालांडे यांनी प्रदर्शनाचे प्रास्ताविक केले तर सूत्रसंचालन शाळा क्र. 120 चे शिक्षक सुरेश पाटील यांनी केले .

# कामगारविरोधी श्रम संहिता विरोधात भिवंडीत कामगार संघटनांची निदर्शने

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी** : केंद्र व राज्य सरकार कामगार कायदे बदलून लागू करण्यात आलेल्या चार श्रम संहिता लागू करण्यात आल्या आहेत.या कामगार विरोधी श्रम संहिता रद्द करण्याच्या मागणीसाठी भिवंडीत मंगळवारी सिटू संलग्न लाल बावटा पावरलूम वारपर व असंघटित कामगार संघटनेच्या माध्यमातून मुंबई आग्रा महामार्गावरील स्व. आनंद दिघे चौक येथे निदर्शने करण्यात आली.

या आंदोलनात संघटनेचे अध्यक्ष कॉम्रेड सुनील चव्हाण,अनिल त्यागी,कमला गट्टू,मुमताज




शेख,सूर्यभान यादव,प्रेमचंद सरोज,सदानंद भारती,प्रमोद यादव,सुरेश सचान यांच्यसह मोठ्या संख्याने कामगार,घरेलु कामगार व बिडी कामगार महिला सहभागी झाल्या होत्या.

केंद्र शासनाने २९ कामगार कायदे बदलून त्यांचे चार श्रम संहीतांमध्ये रूपांतर केले आहे.

या बदला मुळे भारतातील कामगारांनी अथक लढा उभारून मिळवलेल्या कामगार कायद्याचे संरक्षण संपूष्टात येवून कामगारांची परिस्थिती दयनीय वेठबिगारा मजूरा सारखी होणार आहे. केंद्र शासनाने केलेल्या व राज्य शासन करणार असणा-या कामगार कायद्यातील बदलाला संपूर्ण भारतातील केंद्रीय कामगार संघटना विरोध करीत आहेत.त्यामुळे केंद्र सरकारने श्रम संहिता कायदा रद्द करावा अशी मागणी संघटनेचे अध्यक्ष कॉम्रेड सुनील चव्हाण यांनी केली आहे.या आंदोलनात मोठ्या संख्येने कामगार व महिला सहभागी झाले होते.

# डॉ. सुनील खर्डीकर यांचा दिल्लीत सन्मान



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : नवी दिल्ली येथे बाबू जगजीवन रामजी यांच्या ५४व्या राष्ट्रीय विजय दिनानिमित्त खर्डीकर क्लासेसचे संस्थापक डॉ. सुनील खर्डीकर यांनी नुकताच दिल्ली दौरा केला. माजी संसद अध्यक्षा मीरा कुमार व माजी सामाजिक न्याय मंत्री संजय पासवान यांच्या हस्ते यावेळी त्यांनी सन्मान स्वीकारला. राजेंद्र भवन ट्रस्ट व जगजीवन राम कला संस्कृती तथा साहित्य अकादमीच्या मार्फत आयोजित सोहळ्याला मीरा कुमार यांनी खर्डीकर यांच्या शैक्षणिक कार्याचे कौतुक केले तसेच पुढील वाटचालीसाठी शुभेच्छाही दिल्या. याबद्दल डॉ.सुनील खर्डीकर यांनी मीरा कुमार व संयोजकांचे आभार मानले.

डॉ. सुनील खर्डीकर यांच्या समवेत महाराष्ट्रातील आणखीन सात जणांना यावेळी विविध क्षेत्रातील योगदानाबद्दल पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. डॉ.सुनील खर्डीकर हे आपल्या काही निकटवर्तीयांसह नवी दिल्ली येथे उपस्थित राहिले होते. त्यांच्या माध्यमातून त्यांच्या निकटवर्तीयांना सन्मानित करण्यात आले. यादरम्यान त्यांची नव्या महाराष्ट्र सदनात काँग्रेसचे माजी महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष माणिकराव ठाकरे, माजी केंद्रीय गृहमंत्री हंसराज अहिर तसेच माजी आमदार मोहन जोशी यांच्याशी भेट घडली. जीवनात आल्यानंतर समाजाचे आपण काही तरी देणं लागतो, त्यामुळे अडलेल्यांची मदत करणे म्हणजे समाजाप्रति आपली जबाबदारी आपण पार पाडतो. त्याचेच फलित म्हणून अशा प्रकारचे सन्मान आपल्याला दिल्ली दरबारी प्राप्त होतात. अशा भावना यावेळी डॉ.सुनील खर्डीकर यांनी सर्वांशी बोलताना व्यक्त केल्या. याच दरम्यान डॉ.सुनील खर्डीकर यांनी आपल्या निकटवर्तीयांसह राष्ट्रपती भवनात भेट देत संपूर्ण भवनाची माहिती घेतली.

### क्रीडांगण अनुदान घोटाळा प्रकरण

# आण्णा साळवे यांची दोषींवर कारवाईची मागणी




**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुरबाड** : सन २०२२–२३ मध्ये आदिवासी आश्रमशाळांसाठी मंजूर झालेल्या क्रीडांगण विकास अनुदानात मोठ्या प्रमाणावर अपहार झाल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते व अन्याय अत्याचार निर्मूलन समितीचे आण्णा मोतीराम साळवे यांनी केला आहे. एकही प्रत्यक्ष काम न करता बनावट बिले काढून शासनाचा निधी लाटण्यात आला असल्याचा आरोप करत दोषींवर कठोर कारवाईची मागणी करण्यात आली आहे.

मुरबाड–शहापूर तालुक्यातील मोरोशी, खुटल (बारागाव), सासणे (काचकोली), टाकीपठार, पेंढरघोळ–शेणवे व शिरोळ येथील आदिवासी आश्रमशाळांमध्ये प्रत्यक्ष पाहणीत क्रीडांगणाचे कोणतेही काम आढळून आले नाही, तरीही कागदावर काम पूर्ण दाखवून निधी उचलण्यात आल्याचा आरोप आहे. क्रिडांगण विकास निधी ज्या शाळांमध्ये खर्च केला आहे त्या सर्व शाळांची चौकशी करावी अशी मागणी या पत्रात केली आहे.

या गंभीर प्रकरणी आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी, शहापूर राजेंद्रकुमार हिवाळे यांच्याकडे लेखी मागणी करून सखोल चौकशी, १८% व्याजासह निधी वसुली व दोषींवर फौजदारी कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

कारवाई झाली नाही तर प्रकल्प कार्यालय शहापूर यांच्या कार्यालयासमोर आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही अन्याय अत्याचार निर्मूलन समितीचे जिल्हाध्यक्ष आण्णा साळवे यांनी दिला असून, आदिवासीं विद्यार्थ्यांच्या नावाने लूट करणाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे अशी संतप्त प्रतिक्रिया येत आहेत. दरम्यान या संबंधी शहापूर प्रकल्प अधिकारी राजेंद्रकुमार हिवाळे यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयन्त केला असता फोन उचलला गेला नाही.

# समृद्धी वामनची भारतीय वायुदलात फ्लाइंग ऑफिसर म्हणून निवड

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : जिद्द, तपश्चर्या आणि उघड्या डोळ्यांनी पाहिलेल्या स्वप्नांच्या बळावर आकाशालाच आपल्या उंबरठ्यावर आणणारी पोलीस कन्या कुमारी समृद्धी अजित वामन हिने भारतीय वायुदलात फ्लाइंग ऑफिसर म्हणून निवड होऊन कुटुंबासह संपूर्ण ठाणेकरांची मान अभिमानाने उंचावली आहे. याचे औचित्य साधत दि.16 डिसेंबर 2025 रोजी साईनाथ मंदिर, वर्तकनगर, ठाणे येथे समाजसेवक गणेश संपत तांबे यांचे मार्गदर्शनाखाली साईबाबा मंदिर



समिती अध्यक्ष मंगेश बळीराम नईबागकर, शिवसेना गटनेते व ज्येष्ठ माजी नगरसेवक दिलीप बारटक्के यांनी समृद्धीला मनःपूर्वक शुभेच्छा देत मिठाई वाटून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी पोलीस मित्र सदस्य रुपाली जाधव, निशा फुलसुंदर, डांगे मॅडम व अन्य मान्यवर उपस्थित होते.

समृद्धीच्या या ऐतिहासिक

### ठाणेकर कन्येची आकाशझेप

यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून तिच्या उंच भरारीने अनेक तरुणांच्या डोळ्यांत नवी स्वप्ने आणि मनात देशसेवेची प्रेरणा जागी झाली आहे. हे यश म्हणजे केवळ एक पदवी नसून धैर्य, शिस्त, संस्कार आणि देशप्रेमाची सर्वोच्च ओळख आहे,असे गौरवोद्गार आयोजक समाजसेवक गणेश संपत तांबे यांनी व्यक्त केले.




# मावळी मंडळाच्या आंतरशालेय ॲथलेटिक्स स्पर्धेत ठाणे पोलीस स्कूलचे वर्चस्व



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : श्री मावळी मंडळ ठाणे संस्थेने २२ व्या "श्री मावळी मंडळ आंतर शालेय अथेलेटिक्स स्पर्धा २०२५-२६" हि दि. १३ व १४ डिसेंबर २०२५ रोजी संस्थेच्या क्रीडांगणात आयोजीत करण्यात आली होती. सदर स्पर्धेमध्ये ठाण्यातील ४० शाळेच्या ८०० स्पर्धकांनी भाग घेतला होता. या स्पर्धेत "ठाणे पोलीस स्कूलने"या शाळेने मुलांच्या व मुलींच्या गटात सांघिक विजेतेपद मिळवीत सांघिक ओव्हरऑल चॅम्पियनशिपचे पारितोषिक पटकाविले.

स्पर्धेचे उद्घाटन शनिवार दिनांक १३ डिसेंबर २०२५ रोजी प्रमुख पाहुणे राष्ट्रवादी काँग्रेस- अजित पवार गट सचिव, माजी नगरसेवक सुहास देसाई यांच्या शुभहस्ते झाले. या स्पर्धेचा समारोप व पारितोषिक वितरण समारंभ दिनांक १४ डिसेंबर २०२५ रोजी प्रमुख पाहुणे दैनिक सामना कोकण विभाग संपादक राजेश पोवळे, संस्थेचे अध्यक्ष सुधाकर मोरे, उपाध्यक्ष मनीष मुंदडा, खजिनदार रिक्सन फर्नांडिस, चिटणीस रमण गोरे, उप चिटणीस संतोष सुर्वे, सह चिटणीस चिंतामणी पाटील, विश्वस्त कृष्णा डोंगरे, विश्वस्त प्रभाकर सुर्वे, विश्वस्त पॅट्रिक फर्नांडीस व विश्वस्त केशव मुकणे यांच्या शुभहस्ते झाला.

# भिवंडीत बेकायदेशीर शस्त्र बाळगणाऱ्याना पिस्तूलासह अटक

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी** : ठाणे जिल्ह्यात आगामी होणाऱ्या महानगर पालिकेच्या सार्वत्रिक निवडणुका लक्षात घेऊन पोलीस यंत्रणा सतर्क झाली असून ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्या आदेशावरून भिवंडी पोलीस उपआयुक्त कार्यक्षेत्रात विशेष बंदोबस्त व गस्त घालण्याचे आदेश पोलीस पथकास देण्यात आले आहेत.असे असताना भिवंडीतील कोनगांव पोलीस ठाण्याचे हद्दीतील राजनोली नाका या भागात गुन्हा करण्याचे इराद्याने बेकायदेशीरपणे पिस्टल व देशी बनावटी कट्टा व जिवंत काडतुसे बाळगणाऱ्या दोघांना गुन्हे शाखेच्या पोलिसांनी मोठ्या शिताफीने मुद्देमालासह ताब्यात घेऊन अटक केली आहे. त्यांच्या कडून एक मोटारसायकल व दोन मोबाईल फोन सुध्दा जप्त करण्यात आले आहेत.वसीउल्लाह किताबुल्ला चौधरी, (वय ४५ वर्ष,रा. सिडको बिल्डींग, तळोजा,नवी मुंबई) व हिमांशु राजू वर्मा (वय २४ वर्ष, रा. खारघर, नवी मुंबई) असे अटक करण्यात आलेल्या आरोपींची नांवे आहेत.सुरक्षिततेच्या दृष्टीने रात्री 10:30 वा.भिवंडी गुन्हे शाखेचे पोलीस पथक मुंबई नाशिक महामार्गावर गस्त घालित असताना जयभारत रेस्टॉरंटच्या समोरील ब्रिजचे खाली, रांजनोली नाका येथे दोन इसम संशयास्पद फिरताना आढळले त्यामुळे पोलीस पथकाने त्यांची मोटारसायकल अडवून चौकशी करीत त्यांची अंगझडती घेतली असता त्यांच्या कडे लाकडी मुठ असलेले स्टीलचे पिस्टल व देशी बनावटीचा कट्टा असे एकुण 7 जिवंत काडतूस,दोन मोबाईल फोन व एक मोटारसायकल असा एकुण एक लाख 52 हजार 600 रूपये किमंतीचा मुद्देमाल आढळून आला त्यामुळे पोलिसांनी सदर मुद्देमाल हस्तगत करून जप्त केला आहे,ठाणे पोलीस आयुक्त यांच्या मनाई आदेश भंग करुन आपले कब्जात बेकायदेशीरपणे शस्त्र बाळगले प्रकरणी गुन्हे शाखेचे पोलीस कर्मचारी निलेश नेताजी शेडगे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कोनगांव पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपींना अटक केली आहे. पुढील तपास सपोनि शरद पाटील करीत आहेत.

# वैशाखरे गावाने लुटला भिंगारी महोत्सवाचा आनंद

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : कल्याण नजीक असलेल्या मुरबाड तालुक्यातील वैशाखरे सारख्या ग्रामीण भागात पहिल्यांदाच १३ आणि १४ डिसेंबर २०२५ रोजी आर्थियन आर्ट फाउंडेशन तर्फे भिंगरी बालकला महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं. अर्थीयन आर्ट फाउंडेशन च्या माध्यमातून गेले काही वर्ष मुरबाड तालुक्यामध्ये वेगवेगळ्या कलाप्रकारांसाठी, कलाकारांसाठी जागा तयार करण्याचे काम, तसेच या जागेजवळच्या विविध गावातील मुलांसोबत नाटक, चित्रकला आणि संगीत अशा विविध कलानिर्मितीचे काम चालू आहे. या गावाला मुलांना आणि देशभरातील अप्रतिम कलाकारांना एकत्र आणण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला.

यंदाचं भिंगरी महोत्सवाचं हे दुसर वर्ष होतं. या महोत्सवाच्या उद्घाटनाला क्वेस्ट संस्थेचे डायरेक्टर निलेश निमकर, डॉर्फ केटल केमिकल्स इंडिया लिमिटेड कंपनीच्या सीएसआरचे सहाय्यक उपाध्यक्ष संतोष जगधने, कुल्फी बाल साहित्याचे संपादक ऋषिकेश दाभोळकर इ. मान्यवर लाभले होते. या महोत्सवात नाटक, चित्र, गाणी सोबतच क्लाउनिंग, मायमिंग, कथाकथन अशा सारख्या विविध कलांचा संगम पहायला मिळाला. यंदा अर्थियान आर्ट फाउंडेशन च्या कलाकारांनी कथाकथन सादर केले, यातीलच काही कलाकारांनी गावातील मुलांची संगीत,नृत्य आणि नाट्य सादरीकरणे बसविली.

याच बरोबर फोर लिफ क्लोवर यांच रूपकथक नृत्य, संकेत खेडकर यांचं माईम, त्रकधूम म्यूजिक अकादमी यांचं ड्रम सर्कल, अटक मटक यांची पुस्तक कट्टा कार्यशाळा, ओरिगामी मित्र पुणे यांच्या मिलिंद केळकर याचे सत्र, द क्लाउन्स कारवान यांचे क्लाउनिंग आणि थिएटर फ्लेमिंगो गोवा यांच्या नाट्यसदारीकरणाचाही समावेश केला गेला होता. त्याच बरोबर स्थानिक रहिवासी त्यांचे पारंपरिक नृत्य तारपा नाच आणि गौरी नाच मोठ्या उत्साहात सादर करण्यात आले. संपूर्ण गावाने मोठ्या पडद्यावर लघुचित्रपटाचा ही आनंद लुटला.

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024